# रेग्युलर कज्जा क्रमांक ६०/२००२

**श्री.बाबु कोंडी चव्हाण ,**

**विरुध्द**

**श्री.आबाजी दादु चव्हाण**

**निशाणी २०५ व २०६ एकत्रीत आदेश.**

प्रस्तुतचा दावा वादींनी प्रतिवादी यांचे विरोधात दावा मिळकतीचे सरस निरस मानाने वाटप होवून मिळणेसाठी दाखल केलेला आहे. प्रस्तुत दाव्याचे कामी यातील प्रतिवादी नं. ७ हे तारीख १६.०९.२०२० रोजी मयत झालेले आहेत. त्यामुळे त्यांचे वारस रेकॉर्डवर घेणेसाठी सदरचा अर्ज दिवाणी प्रक्रिया संहिता आदेश २२ क्रम ४ प्रमाणे , दिवाणी प्रक्रिया संहिता आदेश ६ क्रम १७ प्रमाणे तसेच सदरचे वारस रेकॉर्डवर घेणेसाठी झालेला विलंब माफ होवून मिळणेसाठी व वारस रेकॉर्डवर घेणेसाठी अर्ज दाखल केलेला आहे.

२. प्रस्तुत अर्जाचे कामी प्रतिवादी यांनी त्याच अर्जावर म्हणणे दाखल करुन अर्जास विरोध दर्शविला आहे. प्रतिवादी यांनी त्यांचे म्हणणे मध्ये आतापर्यंत निरनिराळो प्रतिवादी मयत झाले परंतू वादीने कोणत्याही प्रतिवादीचे वारस मदतीत रेकॉर्डवर आणलेले नाहीत त्यामुळे अर्ज मंजुरीस पात्र नाही तसेच मंजूर करावयाचा झालेस जास्तीत दंडावर मंजूर करावा अशी विनंती केली आहे.

३. वादी व प्रतिवादीतर्फे वकीलांचा युक्तीवाद ऐकला. प्रतिवादी नं. ७ मयत आहे. दिवाणी दाव्यामध्ये प्रतिवादी मयत झाल्यानंतर प्रतिवादींचे वारसांचे विरुध्द दाव्यातील कथने व दाव्याचे कारण अबाधीत असेल तर वारसांना अभिलेखवर आणणे जरुरीचे असते . सदर अर्जाचे कामी प्रतिवादी नं. ७ हे इतर प्रतिवादींच्या बरोबर दाव्याचे कामी आवश्यक पक्षकार होते. प्रस्तुतचा दावा वाटपाचा आहे. प्रस्तावीत वारसांचे हक्कसंबंध दावा मिळकतीत आहेत असे प्रथमदर्शनी दिसून येते. त्यामुळे सदर मयत प्रतिवादी नं. ७ चे वारस देखील दाव्याचे कामी आवश्यक असलेचे दिसून येते. प्रतिवादी यांनी सदरच्या अर्जास म्हणणे देवून अर्ज नामंजूर करावा असे सांगीतले आहे. परंतू वाटपाच्या दाव्यामध्ये वादी अथवा प्रतिवादी मयत झालेनंतर त्यांचे वारस अभिलेखावर आणणे आवश्यक आहे. तसेच दिवाणी प्रक्रिया संहिता आदेश २२ क्रम ४ प्रमाणे असलेली तरतुद व अर्जातील कथने पुरक असलेचे दिसून येते. कोणत्याही दाव्यामध्ये प्रतिवादीचे वारस अभिलेखावर येणे दाव्याचा अंतिम गुणदोषावरती निर्णय होणेस मदत करणारे आहे. प्रतिवादी

नं. ७ चे वारस दाव्यामध्ये अभिलेखावर आल्यास वादी यांचे नुकसान होणार नाही. याउलट प्रस्तावीत वारस अभिलेखावर न आल्यास दाव्याचे पुर्णपणे व न्यायोचीत निसरःन होणार नाही.

४. वादी यांचे कथना प्रमाणे वारस अभिलेखावर घेणेस विलंब झालेला आहे. सदर विलंब होणेसाठीचे कारण म्हणजे प्रतिवादी क्र.७ हे कोव्हीडमुळे गावाबाहेर मयत झालेने त्यांना त्याबाबत माहिती मिळाली नाही व मयत झालेचे वादी यांना त्याबाबत समजले त्यानंतर प्रतिवादी क्र. ७ चा मुृत्युचा दाखला वादीस दिनांक १०.०६.२०२३ इ. रोजी उपलब्ध झाला आहे. सबब प्रतिवादी नं.७ चे वारस अभिलेखावर घेणेकरीता ३ वर्षे ९ महिने १७ दिवसाचा विलंब झालेला आहे. प्रस्तुत अर्जासोबत वादीने शपथपत्र दाखल केलेले आहे. सबब अर्जातील कथनांवर अविश्वास दाखवणे संयुक्तीक नाही. सबब वारस अभिलेखावर घेणेकरिता झालेला विलंब योग्य कारणाने झाल्याचे दिसून येते. जरी वादीने प्रतिवादी कमांक ७ यांचे वारस नोंदी बाबत वेळेत नमुद केले नसले तरी प्रतिवादी क्रमांक ७ यांचे वारस अभिलेखावर घेणे दाव्याचा अंतीम निकालाच्या दृष्टीने संयुक्तीक व न्यायोचीत होणार आहे. प्रतिवादींना झालेल्या त्रासाबाबत वादीस दंड केल्यास न्यायाचा समतोल राखला जाईल. सबब वादी यांचा प्रतिवादी नं.७ चे वारस रेकॉर्डवर घेणेचा अर्ज दंडाच्या अटीवर मंजूर करणेत येत आहे.

## आदेश.

१. वादी यांचे निशाणी **२०५ व २०६** चे अर्ज रक्कम रुपये १०००/- (रक्कम रुपये एक हजार फक्त) च्या दंडावर मंजूर करणेत येत आहेत. दंडाची रक्कम वादीने प्रतिवादीस द्यावी.

२. वादी यांनी अर्जाप्रमाणे प्रतिवादी नं.७ चे वारसांना अभिलेखावर घेवून त्याप्रमाणे वादपत्राची दुरुस्तीप्रत त्वरीत हजर करावी.

३. सदरची दुरुस्ती आदेश झाले तारखेपासून चौदा दिवसाचे आत करावी.

**(सदरचा आदेश खुल्या न्यायालयात घोषित करणेत आला.**

ATUL ASHOK KORE
Digitally signed by ATUL ASHOK KORE
Date: 2023.09.06 11:36:43 +0530

दिनांक ०५.०९.२०२३ . अतुल ए.कोरे ,

सह.दिवाणी न्यायाधिश,क.स्तर.,पन्हाळा .